जन्मलं आहे. त्यामुळे दक्षता द्यावी लागेल. जपावं लागेल.

"हो डॉक्टर ..... नक्कीच काळजी घेऊ आम्ही.
धन्यवाद डॉक्टर !!" आर्यन.

Good ठीक आहे .... असं बोलून डॉक्टर केबिनकडे गेले.

सर्वांनी डॉक्टरांचं बोलणं ऐकलं होतं. खूप वाईट वाटत होतं बाळासाठी. कोणा-कडेच त्याचं उत्तर नव्हतं. सिस्टर जेव्हा बाळाला घेऊन आली तेव्हा आर्यनला त्याच्या इवल्याश्या परीला बघून आनंदाश्रु आवरले नाहीत. पण नक्कीच त्याला आता साईची काळजी होती.

एक-दीड तासाच्या अवधी नंतर साईला शुद्ध आली.
सगळ्यांनी शिफ्ट केलेल्या वॉर्ड मधे जाऊन आनंदाने तिला दुरूनच पहात शु-भेच्छा दिल्या...

मातृत्व लाभल्याचं समाधान, मुलगी झाल्याचे आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकत होताच पण आता स्तनदा माता (breast feeding mother) असूनही बाळा-ला दूध पाजता येणार नाही. हे ही दुःख तिला अस्वस्थ करत होतं.

आई,,,,, बघ ना ग ..... माझ्या बाळाला अत्ताच स्तनपानाची गरज आहे. माझ्या दुधातून तिला रोगप्रतिकारक शक्ती मिळवून ती लवकर सुधारेल ग.... पण हे काय झालं ..... का हा. कोरोना आत्ताच आला माझ्या आयुष्यात..... का माझ्या बाळाचं आणि माझ्या स्पर्श दुरावलाय ग ...... आमची नाळ ती शरीरा पासून जोडलेली ना ... ती मला अजून किती दिवस अनुभवता नाही येणार ....का मला फुटणारा पाझर तिला मिळवण्यापासून थांबवत आहे देवा.... !!!

आजच्या काळात तर ब्रेस्ट फिडिंग हे आगदी "कवच कुंडल" आहेत ग माझ्या बाळाची .... का ? का ? असं झालं ..... साईची अगतिकता आणि हतबलता पाहून सगळ्यांना अश्रु अनावर झाले. बाळ रडू लागल्यावर तर तिथे असलेल्या सर्वांचं हृदय अक्षरशः कळवळे.

आर्यनच्या आईनी पटकन डोळे पुसले आणि बाळाला तोंडात मधाचं चाटण दिलं. मध सक चाटून बाळ थोडं शांत झालं. लगेच त्यांनी सोन्याची गिन्नी नाकपुडीला लावली.

काय तर म्हणे तिची शिंक सुदधा सोन्याच्या किंमतीची असेल. आईचा अंध विश्वास म्हणून की आंधळ प्रेम हेच अर्यनला समजेना.

आज शेजारच्या शहरातील नामांकित डॉक्टर सानें या हॉस्पिटल भेटीसाठी आले होते आणि त्यांनी हे संभाषण ऐकलं आणि डॉ. भावेंकडून सईची केस समजून घेतली आणि पुन्हा येऊन सईला स्तनदा मातांच्या दूध दान (milk donation) बद्दल सांगू लागले.

अश्याच काही इमर्जन्सी केसेस मधे आता नवा विचार, नवी धारा आणि नवी उमेद घेऊन काही स्तनदा माता ज्या काही काळापूर्वी बाळाची आई झालेल्या आहेत आणि दूध दान करू शकतात त्या पुढे येत आहेत आणि बाळाला आणि आईसाठी संजीवनी ठरत आहेत. सगळ समजावून सांगून निघून गेले.

डॉक्टर सानेंनी त्यांच्या ओळखीने आज विनिता नावाच्या स्तनदा मातेला पाठवून दिले.

प्रसन्न चेहऱ्याची विनिता सर्वांशी बोलू लागली......

"खर तर मी एक वर्षाच्या बाळाची आई आहे. काही वर्षापूर्वी माझ्या मावशीच्या Premature baby ला जन्म देऊन ती देवाघरी गेली. तेव्हा दूध दान हा प्रकार खूप कमी होता त्यामुळे बाळाची प्रकृती बिघडली. घरीच घडल्यामुळे तसेच सध्या कोरोनामुळे ही काही कोवळी बाळं आईला मुकली तेव्हा हृदय हेलावून गेलं आणि हा विचार केला मी.

काही इमर्जन्सी मुळे ही परिस्थीती येते तेव्हा मी स्तनदा माता आहे तर बाळाच जीवनात माझं काही उपयोग झाला तर मी स्वतःला धन्य समजते. म्हणून मी हा निर्णय घेतला. यात माझ्या घरच्यांनी ही साथ दिली.

फक्त सीरीनामुळेच नाही तर आजकाल श्रीमंत घरातल्या मुली आपली फिगर डिस्टर्ब होऊ नये म्हणून बाळाला स्तनपान करत नाहीत, कधी येते अश्या मुलींनी..... कारण उलट तुम्ही स्तनपान केलत तर तुमची फिगर मेन्टेनच राहणार आहे. उच्च शिक्षितही मुली असं वागतात तेव्हा खरंच वाईट वाटतं.

असेही उदाहरणं पाहिली मी की मुंबई सारख्या मेट्रो सिटीत गरज म्हणून दोघांचं घडयाळाच्या काट्यावर पळत रहावं लागतं. एका ताईला पहिला मुलगा होऊन होऊन गेला. नंतर मुलगी झाली. घरच्यांच्या दबावामुळे पुन्हा चान्स घेतला.

घरचं सांभाळून नोकरी, प्रवासाची दगदग सहन करून तिने बाळाला जन्म दिला. पण पुन्हा मुलगीच झाली म्हणून तिच्यावर दोष दिला गेला. यात तिची मानसिक स्थिती बिघडली आणि तीच्या शरीरावर परिणाम होऊन तीच स्तनपान करण्याची क्षमता कमी झाली.

त्यावेळी त्या गोंडस मुलीला दुध दान करताना मला स्त्री असल्याचा ~~समर्थ~~ सार्थक वाटलं की मी एका स्त्रीच्या ढासळत्या मनोध्याला आधार देऊ शकले. आणि तिच्या ~~ब~~ बाळाच्या वाढीत थोडी मदत करू शकले."

शेवटी न राहवून सईची आई म्हणजे शुभाताई पुढे आल्या आणि विनिताला विचारू लागल्या.....

" खरतर Premature बाळाला तर आईच्या दुधाची जास्त गरज असते. वरच्या दुधाने काय होणार,..... दुधाची तहान तकावर भागवली. असंच झाले ते.

पण..पण....तुला कसं ???.. "

शुभाताईंची घालमेल विनिताच्या लक्षात आली. तिने हलकं स्मित करत बोलली, "काकू....अगदी बिनधास्त विचारा, तुम्हाला काय वाटलं ? हेच ना, की हे बा तुझं नाहि. तर तुला बाळासाठी पान्हा कसा फुटेल...मायेचा पाझर..ते झरा कसा वाहिल... असच ना ????".

शुभा ताई आता सुमनताईकडे आणि सगळ्यांकडे पाहू लागल्या. सुमनताई डो यांनीच ठीक आहे बोलल्यावर यांना थोड बर वाटलं.

विनिता पुढे बोलू लागली...

"काकू... जरी मी या बाळाची आई नसले तरी... मी स्तनदा माता आहे हे तुम्ही लक्षात घ्या. मी या बाळाची आई नक्कीच नाही... पण मी ममता, ती भावनिकता आणि बाळाला प्रेमळ स्पर्श पुरेसा करतो अमृताचा अंश तहानला.

पण काकू... प्रत्येक वेळी नाही गरज आम्ही छातीशी धरलं पाहिजे असं. स्तनदा माता आपलं दूध साठवून ठेवू शकतात... जशी Blood Bank असते तशाच आता काही ठिकाणी Milk Production Centre असतात. तिथे माझ्या सारख्या अनेक स्तनदा माता आपलं मिल्क डोनेट करण्यासाठी तयार असतात.

नोंदणी केली जाते. चेक अप केलं जातं... सुरक्षितता आणि स्वच्छता बाळगली जाते. अशा प्रकारे milk Donation ही काळाची गरज ओळखून बऱ्याच स्त्रिया मदतीचा हात पुढे करत आहेत. शेवटी नवजात शिशुच्या आयुष्याचा प्रश्न असतो. त्यांची प्रतिकारशक्ती वाढवण्याचा जणु कवच कुंडले चढविण्याचा आमचा हा एक प्रयत्न आणि उदात्त हेतु आहे.

सर्वांच्या चेहऱ्यावर आता एक प्रकारचं समाधान दिसतं आहे. सई सुद्धा खुश झाली आणि तिने आर्यन कडे पाहिलं... आर्यन ने होकारार्थी मान हलवून तिला संमती दिली. आता सगळ्यांच्याच चेहऱ्यावर आनंद दिसु लागला होता.

आता सरांनी सर्वांची परमिशन घेऊन विनिताला Dr formality साठी बोलवायला आले.

सईच्या आई जवळ आल्या... विनिताच्या डोक्यावर हात ठेवला आणि मनापासून आभार मानले... विनिता बोलली... 'काकू... आभार नको हो... फक्त आशीर्वाद द्या. गरजू बाळांची ही अमृताची तहान माझ्याकडून भागवली जावी.

नक्कीच बेटा... खूप खूप आशीर्वाद आणि शुभेच्छा.. आजच्या युगातील नवीन विचारांची तू एक प्रतिनिधी आहेस.

नवी आशा आणि नवी सुरुवात याचं प्रतीक असणाऱ्या गुलाबी रंगाप्रमाणे नवरात्रीतील आजच्या गुलाबी रंगातील या देवीचं मी मनोमन आभार मानते. तू आमच्या परिसराचीच नव्हे तर अनेक बाळांची अमृतधारा आहेस. तुझ्या या कार्याला आणि तुझ्यासारख्या अनेक स्तनदा मातांना अशा अनेक अमृतधारेला खूप खूप शुभेच्छा.

रई सुद्धा आता खुश होती. तिच्या बाळाला ती जरी पाजू शकत नसली तरी एक दुसरी यशोदा जणू त्याचं कुंडल घालत होती.

समाप्त.

स्वाती यादव.

टीप: कोरोनापूर्वी पासूनच ही समस्या होतीच. पण कोरोना काळात प्रकर्षाने जाणवली जेव्हा दुःखद घटना घडल्या. ही चळवळ आता व्यापक होत आहे. समाजासाठी Milk donation खरंच आपलं कर्तव्य किंवा समाज ऋण फेडता येत असतील आणि एखाद्याच्या आयुष्यात संजीवनीचं काम होत असेल तर अशा प्रत्येक स्तनदा मातेचा सन्मान व्हायला हवा. या सामाजिक विषयावर प्रकाश टाकण्याचा मी छोटासा प्रयत्न केला आहे. तो आवडला असल्यास किंवा कसा वाटला हे आपल्या अमूल्य अभिप्रायातून नक्की सांगा.

धन्यवाद



व्हिडिओ पहा

स्वाती यादव.